परिशिष्ठ - 2

## लोहमार्ग पुणे पोलीस शिपाई भरती - २०१९

## पात्र उमेदवारांचे कागदपत्र पडताळणी व मैदानी चाचणी वेळापत्रक

दिनांक ११ /०१/२०२२

१ पात्र ठरलेल्या उमेदवारांची कागदपत्र पडताळणी, शारिरीक पात्रता व शारिरीक चाचणी घेण्याबाबतचे वेळापत्रक खालील प्रमाणे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आह

२. पात्र उमेदवारांची कागदपत्र पडताळणी, शारिरीक मोजमाप, व शारिरीक चाचणी **दिनांक १७/०१/२०२२ ते १९/०१/२०२२ पर्यत राज्य राखीव पोलीस बल गट क्र १ पुणे येथे घेण्यात येणार आहे.** सदर चाचण्या या विहीत पात्रतेच्या अधिन राहून घेण्यात येतील. त्यानुसार दिनांकानुसार सोबत यादी प्रसिध्द करण्यात येत आहे. उमेदवारांनी त्यांना नेमुन दिलेल्या दिनांकास शारिरीक मोजमाप कागदपत्र पडताळणीसाठी सकाळी ०८.०० वाजता न चुकता उपस्थित रहावे. त्यांनतर पात्रेच्या अधिन राहून मैदानी चाचण्याविषयी मैदानावर सूचना देण्यात येतील. सदरची प्रक्रिया ३ दिवस चालणार आहे उमेदवारांनी त्याप्रमाणे तयारीत यावे.

३.. सदर चाचण्याकरीता उमेदवारांना त्यांचे प्रवेशपत्र कागदपत्र पडताळणी व शारिरीक मोजमाप या दिवशी देण्यात येईल.

४. सोबत जातप्रवर्ग निहाय व समांतर आरक्षण निहाय कट ऑफ मार्क्स चा तक्ता सर्व उमेदवारांना माहितीकरीता सोबत जोडण्यात आलेला आहे.

५ <u>उमेदवारांसाठी सूचना</u>

कागदपत्रे पडताळणीसाठी हजर राहताना उमेदवारांनी खालील नमूद मूळ कागदपत्रे व सदर कादपत्रांची छायांकित १ प्रत सोबत घेवुन यावे.

- **ओळखपत्र ( आधारकार्ड/मतदान कार्ड/ वाहन परवाना व इ.)**
- **पासपोर्ट साईजचे ३ फोटो.**
- **१० वी / १२ वी उत्तीर्ण गुण प्रमाणपत्र व बोर्ड प्रमाणपत्र**
- **पदवी / पदविकाधारक / पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र (असल्यास )**
- **जन्म दाखला**
- **डोमासाईल (अधिवास प्रमाणपत्र )**
- **जातीचा दाखला ( जात प्रमाणपत्र )**
- **जात वैधता प्रमाणपत्र ( लागू असल्यास )**
- **खेळाडू प्रमाणपत्र पडताळणी अहवाल शासन निर्णय दिनांक ०१/०७/२०१६ मधील सुधारीत तरतूदीनुसार ( लागू असल्यास )**
- **महिला उमेदवारांसाठी नॉन क्रिमिलेअर (अनुसूचित जाती / जमाती वगळून )**
- **संबधित जात प्रवर्गाचा दावा करणा-या संबंधित विधीप्राय जात प्रमाणपत्र व प्रगत गटात (क्रिमीलेअर) मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (अनुसूचित जाती / जमाती वगळून )**
- **समांतर आरक्षण ( महिलांसाठी ३० टक्के / खेळाडू / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / माजी सैनिक / अंशकालीन /पोलीस पाल्य / गृहरक्षक दल / अनाथ ) याबाबतची विधी ग्राह्य प्रमाणपत्रे सोबत असावीत.**

६. कागदपत्र पडताळणी व शारिरीक मोजमाप प्रक्रियेस हजर राहतेवेळी उमेदवारांनी कोरोना नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. तसेच मास्क लावून यावे व सॅनिटायझर सोबत घेवुन यावे.

७. जे उमेदवार विहीत दिनांक व वेळेत हजर राहणार नाहीत त्यांना गैरहजर समजून भरती प्रक्रियेतून अपात्र करण्यात येईल याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. .

८. उमेदवारांनी लेखी परीक्षेच्या वेळेस त्यांचे जे छायाचित्र व व्हीडीओ रेकॉडिंग परिक्षा केंद्रावर घेण्यात आले होते.व उमेदवारांनी परिक्षेचा फॉर्म भरताना जे छायाचित्र दिलेले आहे ते शारिरीक चाचणीच्या वेळेस जो उमेदवार समोर आलेला आहे त्यामध्ये तफावत दिसुन आल्यास, अतितात्काळ भादवि १८६० अन्वये गंभीर स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात येईल.

९. शारिरीक चाचणीच्या वेळी फोटाग्राफ सीसीटीव्ही व्हीडीओ रेकॉडिंग थंब इम्प्रेशन घेण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी.

१०. उमेदवारांनी शारिरीक व मैदानी चाचणीस येताना covid-१९ ची RTPCR चाचणी अन्यथा व्हॅक्सीनचे दोन डोस घेतलेले प्रमाणपत्र सोबत आणणेअनिवार्य आहे.

( सदानंद गं वायसे-पाटील ) भा.पो.से
पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे